## विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी २०२१.

### अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी. २०२०/प्र. क्र. ७९/का. बारा.—फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यात अंमलात असताना, त्यांच्या कलम ७ (३) तसेच कलम ९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत पूर्वी काढलेल्या सर्व शासकीय अधिसूचनांचा जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी महसूली तालुक्यांशी त्यांचा जेथवर संबंध असेल, तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करुन, महाराष्ट्र शासन, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करून, याद्वारे दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ पासून जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी महसूली तहसिलाकरीता एक उप सत्र विभाग निर्माण करीत आहे आणि उक्त उप सत्र विभागाच्या हद्दीमध्ये उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधिश ज्यांचे अध्यक्ष असतील, असे उप विभाग सत्र न्यायालय अंबड येथे स्थापन करीत आहे. प्रमुख सत्र न्यायाधिश, जालना हे अंबड उप सत्र विभागाचे देखिल अतिरिक्त सत्र न्यायाधिश असतील आणि त्यांना, उक्त उप सत्र विभागामध्ये प्रकरणांतील अधिकार स्वत:हून काढून घेण्याचे किंवा सलग अधिकारितेच्या इतर कोणत्याही न्यायालयास नेमून देण्याचे किंवा, त्यांस योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, अंबड येथील अतिरिक्त सत्र न्यायाधिश यांचेकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**

शासनाचे सह सचिव व विधि सल्लागार.